## संक्षिप्त

### कारच्या धडकेत रिक्षाचालक जखमी

**देवरूख :** मुंबई-गोवा महामार्गावर सावर्डेहून रत्नागिरीच्या दिशेने प्रवासी घेऊन जाणाऱ्या रिक्षाला मागून भरधाव आलेल्या इर्टिगा कारने धडक दिल्याची घटना पैसाफंड हायस्कूलसमोरील पुलावर गुरुवारी घडली. या अपघातात रिक्षाचालकाला किरकोळ दुखापत झाली असून दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. याप्रकरणी संगमेश्वर पोलिस ठाण्यात कारचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कपिल प्रकाश शिरसेकर (४१, रा. कोकणनगर, रत्नागिरी) यांनी याबाबत फिर्याद दिली. मिळालेल्या माहितीनुसार, १६ सप्टेंबर रोजी सायंकाळी सुमारे ४.२० वा. शिरसेकर हे त्यांच्या ताब्यातील रिक्षा क्र. एमएच ०८ बीसी ०७०७ मधून प्रवासी घेऊन सावर्डेहून रत्नागिरीच्या दिशेने मुंबई-गोवा महामार्गावरून जात होते. पैसाफंड हायस्कूलसमोरील पुलावर रिक्षा आली असता मागून येणाऱ्या इर्टिगा कार क्र. एमएच ४७ ए.वाय. १६३४च्या चालकाने रस्त्याची परिस्थिती लक्षात न घेता वाहन अतिवेगाने चालविल्याचा आरोप आहे. या कारने रिक्षाच्या मागील उजव्या बाजूस जोरदार धडक दिल्याने दोन्ही वाहनांचा अपघात झाला. याप्रकरणी राम प्रकाश लाल (४०, रा. बोरीवली पश्चिम, लिंक रोड, गणपत पाटीलनगर, मुंबई, मूळ उत्तर प्रदेश) यांच्याविरोधात संगमेश्वर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

### गांजा सेवन करणाऱ्या चौघांवर गुन्हे

**मंडणगड :** पणदेरी परिसरात गांजा सेवन करणाऱ्या चौघांविरुद्ध मंडणगड पोलिसांनी दोन स्वतंत्र कारवायांत गुन्हे दाखल केले. १६ सप्टेंबर रोजी रात्री अवघ्या काही मिनिटांच्या अंतराने ही कारवाई करण्यात आली. पहिली कारवाई रात्री ८.३०च्या सुमारास पणदेरीजवळ रस्त्याच्या कडेला करण्यात आली. तेथे साबर रजा अमीर बुरुंडकर (३०, रा. पणदेरी) हा गांजा सेवन करताना आढळला. त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर रात्री ९.१०च्या सुमारास पणदेरीजवळ नदीकाठी पोलिसांनी दुसरी कारवाई केली. येथे आदेश उदय तांबे (३४), समीर विलास तांबे (२५, दोघे रा. पेवे बौद्धवाडी) व आसिफ अ. समद ठोकण (३०, रा. पणदेरी) हे तिघे गांजा सेवन करताना आढळले. त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### डोंगरतिठा येथे कारची धडक; दोघे जखमी

**राजापूर :** राजापूर तालुक्यातील डोंगरतिठा येथे टाटा पंच आणि स्विफ्ट डिझायर या दोन वाहनांची जोरदार धडक होऊन दोघे जखमी झाले. हा अपघात १७ सप्टेंबर रोजी सकाळी ११.१०च्या सुमारास झाला. याप्रकरणी निळकंठ सुभाष थळेश्री (३२, रा. नाटे, थळेश्रीवाडी) यांच्या फिर्यादीवरून स्विफ्ट डिझायर चालक उमेश राजाराम हिंदळेकर (४५, रा. विक्रोळी, मुंबई) याच्याविरुद्ध राजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निळकंठ थळेश्री हे टाटा पंच (एमएच ०८ बीई ०५८५) घेऊन नाटे ते कणकवली असा प्रवास करीत होते. डोंगरतिठा येथे आल्यानंतर सागवे रस्त्यावरून डोंगरच्या दिशेने जाणारी स्विफ्ट डिझायर (एमएच ४६ बीके ३१५७) समोर आली.जैतापूर-हातिवले मुख्य मार्गावरील वाहतूक पाहून रस्ता ओलांडताना खबरदारी घेणे अपेक्षित असताना हिंदळेकर यांनी वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून अचानक रस्त्याच्या मध्यभागी आणल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. त्यामुळे दोन्ही वाहनांची जोरदार धडक झाली. या अपघातात टाटा पंचमधील महेश थळेश्री आणि काव्या थळेश्री हे दोघे जखमी झाले. अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पोटदुखी, जुलाबानंतर महिलेचा मृत्यू

**रत्नागिरी :** जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असताना २२ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. दीपाली दयानंद ठाकूर (२२, रा. खालची आळी, रत्नागिरी) असे मृत महिलेचे नाव आहे. याप्रकरणी रत्नागिरी शहर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दीपाली ठाकूर यांना १३ सप्टेंबर रोजी घरी असताना पोटदुखी व जुलाबाचा त्रास सुरू झाला. त्रास वाढल्याने त्यांचे पती दयानंद इंद्रदेव ठाकूर यांनी त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. दरम्यान, १७ सप्टेंबर रोजी पहाटे ४.५२ वाजता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. वैद्यकीय अधिकारी पीयुष उमलमगले यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. या घटनेची नोंद शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

### गांजा सेवन करणाऱ्या दोघांवर गुन्हा

**देवरूख :** संगमेश्वर तालुक्यातील आंबा हनुमान स्टॉप येथे गांजासदृश अंमली पदार्थाचे सेवन करताना दोघांना देवरूख पोलिसांनी पकडले. गुरुवारी (१७ सप्टेंबर) सायंकाळी ६.१५ च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी ओंकार हरिश्चंद्र सुर्वे (३०, रा. निवेबुद्रुक, सरोदेवाडी) आणि अजित उर्फ आऊ अनंत चव्हाण (५५, रा. देवरूख, मच्छीमार्केट परिसर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आंबा हनुमान स्टॉप येथील एका बंद हॉटेलच्या पाठीमागे शेडजवळ दोन्ही संशयित अंमली पदार्थाचे सेवन करताना आढळून आले. पोलिसांनी त्यांच्यावर कारवाई करत ताब्यात घेतले. याप्रकरणी पोलिस हवालदार सचिन नामदेव कामेरकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून देवरूख पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १५०/२०२६ अन्वये एनडीपीएस कायद्यातील कलम ८ (क) व २७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पुढील तपास देवरूख पोलिस करीत आहेत.

### बसच्या धडकेत सुरक्षारक्षक जखमी

**रत्नागिरी :** खोपोली : मुंबई-पुणे हायवेवर बसचया धडकेत एक सुरक्षा रक्षक जखमी झाल्याची घटना १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली आहे. आरोपी चालक (रा. कोल्हापूर) यान स्वत:च्या ताब्यातील बस ही हॉटलच्या पार्किंगमध्ये मुंबई-पुणे एक्सपेस हायवेवर मुंबई लेनवर आली. त्यावेळी रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अतिवेगाने चालविली. त्याचे बसच्या वेगावरील नियंत्रण सुटल्याने बसचालकाने हॉटेलच्या पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या सुरक रक्षकाला धडक दिली. या धडकेत सुरक्षा रक्षक जखमी झाला असून याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास हवालदार चव्हाण करत आहेत.

# कारचालकावर हल्ला करणारे तिघेजण जेरबंद

## नाशिक येथून केली अटक; रागातून हल्ला केल्याची कबुली: २१ पर्यंत पोलीस कोठडी

**कणकवली : पुढारी वृत्तसेवा**

राजापूर ते गोवा असे भाड्याच्या कारने जात असताना रविवार १३ सप्टेंबर रोजी रात्री महामार्गावर हूंबरठ येथे कारचालक रेहान इकबाल सय्यद (३२, रा. वाघुवाडी राजापूर) याच्यावर चाकूने हल्ला करून पसार झालेल्या तिघांना कणकवली पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक तपासावरून नाशिक येथून जेरबंद केले.

मद्यप्राशन स्थितीत असलेल्या या संशयितांना गाडीत सिगरेट ओढू दिली नाही तसेच मध्ये कार थांबवली नाही या रागातून त्यांनी रेहान याच्यावर हल्ला केल्याची कबुली त्यांनी पोलिसांकडे दिली. तिघांना कणकवली न्यायालयात हजर केले असता २१ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली.

गौरव शिवाजी कासव (२४), गिरीश देवाजी जामदार (२४), विकास ज्ञानेश्वर पठाडे (२५, सर्व रा. अहिरखेडे ता. चांदवड जिल्हा नाशिक) अशी या संशयितांची नावे आहेत. हे तिघे संशयित गोव्यात फिरण्यासाठी रेल्वेने निघाले होते. मात्र, ते विनातिकीट प्रवास करत असल्याने त्यांना राजापूर येथे टिसीने उतरवले. त्यानंतर ते ऑटोरिक्षाने राजापूर बसस्थानकाकडे आले.

रविवार १३ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास राजापूर बसस्थानकानजीक रेहान इकबाल या कार चालकाशी त्यांची भेट झाली. त्यांनी राजापूर ते गोवा येथे जाण्यासाठी ४ हजार रुपये भाडे ठरवले व गोवा येथे जाण्यासाठी निघाले.

महामार्गावर हुंबरठ येथे रात्री १० वा.च्या सुमारास त्यांनी गाडी थांबवण्यास सांगितली. गाडी थांबवल्यानंतर त्यांनी रेहानकडे गाडीची चावी मागितली, पण रेहानने त्यास नकार दिला. दरम्यान वाटेत त्यांना गाडीत सिगरेट ओढू दिली नव्हती. या सर्व रागातून त्यातील एकाने रेहान याचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला तर दुसऱ्याने त्यांच्यावर चाकुने वार केले, मात्र प्रतिकार करत रेहान गाडीतून बाहेर पडल्याने त्यांचा जीव वाचला.

दरम्यान आरडाओरड केल्यामुळे ते हल्लेखोर तेथून पळून गेले. मात्र या हल्ल्यात रेहान गंभीर जखमी झाले होते, त्यानंतर जखमी अवस्थेत असलेल्या रेहान यांना आरटीओ अधिकाऱ्यांनी कणकवली पोलिसांना खबर दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याला कणकवली उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

या गुन्ह्याचा तपास कणकवलीचे पोलीस निरीक्षक कमलेश बच्छाव यांच्या मार्गदर्शाखाली सुरू होता, पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तसेच तांत्रिक तपासावरून या संशयीतांचा माग काढत त्यांना नाशिक येथून जेरबंद केले.

याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक पन्हाळे यांच्या नेतृत्वाखाली टीमने ही कारवाई केली तर सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री पवार यांनी त्यांचा माग काढला.

# गडनदीपात्रात बुडून तरुणाचा मृत्यू

## मालवण-हिवाळे गावातील दुर्घटना; गौरी उत्सवासाठी आला होता गावी

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**



मालवण तालुक्यातील हिवाळे - घुरीवाडी येथील मूळ रहिवासी तथा सध्या मुंबई-नालासोपारा येथे वास्तव्यास असलेल्या व गौरी गणपती सणासाठी आपल्या हिवा येथे गावी आलेल्या यश अनंत धुरी (१८) या तरुणाचा हिवाळे घुरीवाडी देवकोंड ब्रिजच्या वरच्या बाजूला नदीत पोहण्यासाठी गेला असता पाण्यात बुडन मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी सकाळी १०.३० वा. च्या दरम्याने घडली.यश धुरी हा गौरी-गणपती उत्सवासाठी आपल्या वडिलांसमवेत गुरुवार १७ रोजी मुंबईवरून गावी आला होता. गुरुवारी रात्रीपासून पहाटेपर्यंत तो वाडीतील भजनात सहभागी झाला होता. शुक्रवारी स. १० वा. च्या दरम्यान तो वाडीतील मित्रांसोबत गडनदीपात्रातील ब्रिजच्याच्या बाजूला असलेल्या देवकोंड परिसरात पोहण्यासाठी नदीत उतरला. पोहताना पाण्याच्या चक्रीय प्रवाहाचा अंदाज न आल्याने तो पाण्यात बुडाला. दरम्यान सोबत असलेल्या मित्राला तो दिसून न आल्याने त्याने याबाबत वाडीतील ग्रामस्थांना माहिती दिली. ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत शोध सुरू केला. या घटनेची खबर हिवाळे पोलीस पाटील वींरेंद्र कदम यांनी बेळणे पोलीस दूरक्षेत्राला दिल्यावर आचरा पोलिसांनी घटनास्थळी जात माहिती घेतली. दोन तासांनंतर यशचा मृतदेह गाळात रूतलेला आढळला.

# जयगड येथे जहाजावरील इजिप्तच्या नागरिकाचा मृत्यू

## 'एमव्ही रेक एलिट' जहाजावरील ३५ वर्षीय सेफ्टी ऑफिसर; पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

अरेबियन समुद्रात 'एमव्ही रेक एलिट' या जहाजावर १० एप्रिल रोजी झालेल्या दुर्घटनेत इजिप्तच्या ३५ वर्षीय नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. इस्लाम आदेल अहमद अब्देल लतिफ असे मृताचे नाव असून ते या जहाजावर सेफ्टी ऑफिसर व थर्ड ऑफिसर म्हणून कार्यरत होते. या प्रकरणी जयगड सागरी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १० एप्रिल रोजी दुपारी १.३० च्या सुमारास अरेबियन समुद्रात 'एमव्ही रेक एलिट' जहाजावर ही दुर्घटना घडली. घटनास्थळाचे स्थान १४.१० उत्तर अक्षांश आणि ५५.२८ पूर्व रेखांश असे नमूद करण्यात आले आहे. या दुर्घटनेनंतर 'एमव्ही रेक एलिट' हे जहाज १६ एप्रिल रोजी दुपारी १२.४५ वाजता रत्नागिरी तालुक्यातील जयगडमधील जेएसडब्ल्यू बंदरात दाखल झाले. यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्र, वाटद-खंडाळा येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून संबंधित घटनेची माहिती प्राप्त झाली. घटनास्थळ मुंबईतील यलो गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीत येत नसल्याने तेथील कागदपत्रे रत्नागिरी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे वर्ग करण्यात आली.

दरम्यान, या प्रकरणाची पुढील चौकशी जयगड सागरी पोलीस ठाण्यामार्फत करण्याचे आदेश प्राप्त झाले. पोलीस अधीक्षक कार्यालयातून १० सप्टेंबर रोजी प्रकरण जयगड सागरी पोलिसांकडे वर्ग करण्यात आले. त्यानुसार १७ सप्टेंबर रोजी सकाळी ११.२६ वाजता अकस्मात मृत्यू झाला.

मृत इस्लाम आदेल अहमद अब्देल लतिफ हे इजिप्तचे नागरिक आहेत. त्यांच्या मृत्यूमागील नेमके कारण आणि दुर्घटनेची परिस्थिती याबाबत जयगड सागरी पोलिसांकडून पुढील चौकशी करण्यात येत आहे.

# बनावट मद्य कारखान्यातील संशयितांना ५ दिवसांची कोठडी

## स्पिरिट, छापील बुचे व लेबलचा पुरवठा कुठून?; राज्य उत्पादन शुल्क विभागाचा तपास सुरू

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

राजापूर तालुक्यातील तळगाव येथे बनावट विदेशी मद्य तयार करून त्याचे बॉटलिंग करणाऱ्या कारखान्याचा राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने पर्दाफाश केल्यानंतर अटक केलेल्या दोन्ही संशयिताना न्यायालयाने ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

बनावट मद्यनिर्मितीसाठी लागणारे स्पिरिट, ब्रॅण्डेड मद्याच्या बाटल्यांची छापील बुचे, लेबल नेमके कुठून मिळाले, याचा तपास सुरू झाला आहे.

तळेगाव येथे बुधवारी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने बनावट विदेशी मद्यनिर्मितीच्या कारखान्यावर छापा टाकला. निरीक्षक अमित पाडाळकर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. अधीक्षक कीर्ती शेडगेही कारवाईवेळी उपस्थित होत्या. या प्रकरणी कारखाना असलेल्या जागेचे मालक दिनेश आणि मद्यनिर्मिती करणारा चंदन यांना अटक करण्यात आली. दोन्ही संशयिताना न्यायालयात हजर केले असता त्यांना ५ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली. या कारवाईत अत्याधुनिक यंत्रसामग्री, मद्याचे मिश्रण आणि अन्य साहित्य असा एकूण १ कोटी ५ लाख ८१ हजार ५४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**पुरवठा साखळीचा शोध**

आरोपी पोलिस कोठडीत असल्याने बनावट मद्यनिर्मितीच्या संपूर्ण साखळीचा तपास करण्यास उत्पादन शुल्क विभागाला आता वाव मिळणार आहे. मद्यनिर्मितीसाठी लागणारे स्पिरिट कोणत्या टँकरमधून कोणत्या राज्यातून आणण्यात आले, नामांकित विदेशी मद्य कंपन्यांच्या बाटल्यांसाठी वापरण्यात येणारे छापील बुचे व लेबल कोणी पुरवले, याचा तपास करण्यात येणार आहे. या तपासातून बनावट मद्यनिर्मितीमागील आणखी व्यक्तींची नावे समोर येण्याची शक्यता असून, या प्रकरणातील आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.


**PUBLIC NOTICE**

Notice Is Hereby Given To The General Public That The Person Namely **Mr.Sanjaykumar Kalubhai Radadiya,** Is My Husband. However, At Present, There Is No Marital, Personal, Or Financial Relationship Or Transaction Between Us.Therefore, The General Public Is Hereby Specifically Cautioned And Informed Not To Enter Into Any Financial Or Monetary Transaction, Lending, Borrowing, Credit, Or Any Other Financial Dealings With The Aforesaid Person.If Any Person Enters Into Any Financial Or Monetary Transaction With The Aforesaid Person, Such Transaction Shall Be At The Sole Risk And Responsibility Of That Person. I Or My Son **Vraj Sanjay Radadiya** or Any Of My Family Members Shall Not Be Responsible Or Liable In Any Manner Whatsoever For Any Such Transaction, Liability, Loss, Or Consequence Arising Therefrom.Furthermore, If The Aforesaid Person, Or Any Person Acting On His Behalf, Visits My Residence, Calls Me, Sends Me Messages, Or Otherwise Contacts Me For Any Demand Or Recovery Of Money, Threat, Coercion, Or Pressure, Appropriate Legal Proceedings Shall Be Initiated Against Such Person In Accordance With The Applicable Law.The General Public Is Therefore Requested To Take Due And Serious Note Of This Public Notice And Act Accordingly.

**Place: Mumbai**
**Date : 19.09.2026**

**Issued by :**
**Name : Bhagvati Sanjay Radadiya**
**Address :** 3/303, Shubh Jivan Apartment, R.T. Road, Dahisar, East Mumbai.


# उनाड गुरांचा उच्छाद; महिलेला तुडवले

## मारुती आळीत थरारक घटना; रस्त्यावर नागरिकांच्या जीवाशी खेळ

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

शहरातील उनाड गुरांचा उच्छाद दिवसेंदिवस वाढत असताना शुक्रवारी मारुती आळीमध्ये धक्कादायक प्रकार घडला. रस्त्यावरून पायी जाणाऱ्या महिलेला पाठीमागून धावत आलेल्या गुरांनी जोरदार धडक दिली. धडकेने महिला रस्त्यावर कोसळल्यानंतरही गुरे थांबली नाहीत; उलट तिच्या अंगावरून पाय देत पुढे धावली. या घटनेत महिला जखमी झाली. त्यामुळे शहरातील उनाड गुरांचा प्रश्न केवळ वाहतुकीचा राहिला नसून नागरिकांच्या जीविताच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न बनला आहे.

**मालक शोधण्यात पालिका व्यस्त; गुरेरस्त्यावरच**

उनाड गुरे पकडून त्यांची देखभाल करण्यासाठी संस्था शोधण्याचे काम नगर परिषदेकडून सुरू आहे. काही संस्थांशी चर्चाही झाली आहे. मात्र, आर्थिक गणितामुळे अद्याप अंतिम निर्णय झालेला नसल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे पालिकेची प्रक्रिया सुरू असताना नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न मात्र रस्त्यावरच पडला आहे.

गणेशोत्सवामुळे शहरातील बाजारपेठा आणि रस्त्यांवर नागरिकांची वर्दळ वाढलेली असतानाच उनाड गुरे मोकाटपणे रस्त्यांवर फिरत आहेत. रस्त्याच्या मधोमध ठाण मांडून बसणे, अचानक धावत येणे, वाहनांच्या आडवे जाणे असे प्रकार सातत्याने घडत आहेत. त्यामुळे पादचारी, दुचाकीस्वार आणि वाहनचालकांना जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत आहे.

मारुती आळीतील घटनेने या समस्येची तीव्रता पुन्हा समोर आली आहे. गुरांच्या धडकेने महिला खाली पडल्यानंतर तिच्या अंगावरूनच गुरे धावत गेल्याने प्रसंग अधिक गंभीर झाला. वेळीच उपचार मिळाल्याने मोठा अनर्थ टळला असला तरी या घटनेनंतर नगर परिषदेच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. उनाड गुरांचा प्रश्न केवळ वाहतुकीचा राहिला नसून नागरिकांच्या जीविताच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न बनला आहे.


**इन्व्हेंट ॲसेट्स सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड** | invent

**नोंदणीकृत कार्यालय :** बखतावर, सुट 'बी', तळमजला, बॅकबे रेक्लमेशन स्कीम ब्लॉक III, २२९, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१ दूर.क्र. : (०२२) २२८० १५१६, **फॅक्स क्र.** (०२२) २२८०१५१५

**ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)**

जसे की खाली स्वाक्षरी करणारे हे **इन्व्हेंट ॲसेट्स सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**, चे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (दुसरा) कायदा, २००२ (कायदा) नुसार अधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या (नियम ३) सह कलम १३(१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांनुसार त्यांनी कर्जदार **श्री. बिक्रम सेन** यांना दिनांक **जून १०,२०२६ रोजी** मागणी सूचना जारी करून सदर सूचनेत नमूद केलेली रक्कम **रू. १४,५५,६५,५७४.००/- (रूपये चौदा कोटी पंचावन्न लाख पासष्ट हजार पाचशे चौऱ्याहत्तर फक्त) जून ९, २०२६ रोजीप्रमाणे** त्यावरील पुढील व्याजासहीत सदर सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून **६० दिवसांमध्ये** भरणा करण्यास सांगण्यात आले होते.

कर्जदार, जामीनदार आणि गहाणवटदार यांना थकीत देय रकमेची परतफेड करण्यात अपयश आल्यामुळे, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि गहाणवटदार तसेच सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की खाली स्वाक्षरी करणारे यांनी कायद्याचे कलम १३च्या उपकलम (४) तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ चा नियम ८ नुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करून, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचा दिनांक **वर्ष २०२६च्या सप्टेंबरच्या १७व्या दिवशी ताबा घेतला** आहे.

कर्जदार, जामीनदार आणि गहाणवटदार यांचे कायद्याचे कलम १३चे उपकलम(८) च्या तरतुदींकडे लक्ष वेधण्यात येत आहे. त्यानुसार उपलब्ध वेळेत, त्यांनी तारण मालमत्ता सोडवून घ्याव्यात

याद्वारे कर्जदार आणि जामीनदार आणि गहाणवटदार यांना विशेषकरून आणि सर्वसाधारण जनतेला सावधगिरीचा इशारा देण्यात येतो की त्यांनी मालमत्तेशी निगडीत कोणत्याही प्रकारे व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार झाल्यास रक्कम **रू. १४,५५,६५,५७४.००**/-त्यावरील पुढील व्याजासहीत **इन्व्हेंट ॲसेट्स सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड** यांच्या प्रभारात राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

फ्लॅट क्र. ६०१ आणि ६०२, ६वा मजला, एफ विंग, धीरज इनसिग्निया, सी एस टी रोड, कलिना, ऑडी शोरूम जवळ, मुंबई ४०० ०५५

**स्वाक्षरी/-**
**स्वाती गोपलानी,**
**अधिकृत अधिकारी**

**दिनांक :** सप्टेंबर १७, २०२६
**ठिकाण :** मुंबई
**इन्व्हेंट ॲसेट्स सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**


# गस्ती नौकेच्या धिम्या वेगामुळे एलईडी मासेमारी सुरूच

## गस्ती नौका धडधडत असल्याने गस्ती पथकातील अधिकारी, कर्मचारी त्रस्त

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

अवैध एलईडी प्रकाशातील आणि १० वावापर्यंत समुद्रात मासेमारी करणाऱ्या नौकांवर कारवाई करताना सहाय्यक मत्स्य व्यवसाय विभागाच्या गस्ती पथकावर डुगूडुगू चालणाऱ्या शारदा गस्ती नौकेचा आणि अपुऱ्या अधिकाऱ्यांचा अडथळा निर्माण झाला आहे. गस्ती नौका ताशी ८ ते १० नॉटीकलपर्यंतच धावू शकतेय. त्याचबरोबर लाटांच्या माऱ्यानेही गस्ती नौका धडधडत असल्याने गस्ती पथकातील अधिकारी, कर्मचारी अंगदुखीने त्रस्त होत आहेत. त्यामुळे अवैध मासेमारी करणाऱ्यांचे फावले आहे.

मिरकरवाडा समुद्रात १० वावाच्या आत यांत्रिकी नौका एलईडी मासेमारी करून मोठ्या प्रमाणात म्हाकुळ मासा पकडत असल्याच्या तक्रारी पारंपरिक मच्छिमारांकडून होवू लागल्या आहेत. त्यामुळे पारंपरिक होड्या आणि गिलनेट मच्छिमार नौकाना मासळी मिळेनाशी झाली आहे.




**सूचना**

**प्राइम सिक्युरिटीज लिमिटेड** | PRIME

**(सी.आय.एन.: एल६७१२०एमएच१९८२पीएलसी०२६७२४)**

**नोंदणीकृत कार्यालय:** ११०९/१११०, मेकर चेंबर ५, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२१

**दूर.:** +९१-२२-६१८४२५२५ फॅक्स: +९१-२२-२४९७०७७७ **वेबसाईट:** www.primesec.com **ईमेल:** prime@primesec.com

याद्वारे सूचना देण्यात येते की, सेबी परिपत्रक SEBI/HO/MIRSD/DOS3/CIR/P/2018/139 दिनांक ६ नोव्हेंबर २०१८, सेबी परिपत्रक SEBI/HO/MIRSD/MIRSD-PoD/P/CIR/2025/97 दिनांक २ जुलै २०२५ आणि सेबी परिपत्रक HO/38/13/11(2)2026-MIRSD-POD/ I/3750/2026 दिनांक ३० जानेवारी २०२६ अन्वये, खालील तपशिलानुसार सुरक्षा धारकाच्या/धारकांच्या नावावर असलेले रोखे प्रस्तावित हस्तांतरिताच्या नावावर हस्तांतरित करण्यासाठी कंपनीला विनंती प्राप्त झाली आहे. हे रोखे त्याच्या/तिच्या/त्यांच्याद्वारे खरेदी केले गेले असल्याचा दावा केला गेला होता आणि त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे हस्तांतरित केले जाऊ शकले नाहीत.

| अ. क्र. | फोलिओ क्र. | रोख्यांचा प्रकार आणि दर्शनी मूल्य | धारकाचे नाव | धारकाचा नोंदणीकृत पत्ता | शेअर्सची संख्या | विशिष्ट क्रमांक | प्रस्तावित हस्तांतरिताचे नाव | प्रस्तावित हस्तांतरिताचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जी०६५६७ | समभाग, दर्शनी मूल्य रु. ५/- प्रत्येक | गोविंद दयाल सिंग | पटेल नगर, तकिया बाजार, पोस्ट ऑफिस-सासाराम, जि. रोहतास, बिहार | १०० | १३०७०९२६ ते १३०७१०२५ | शेखर संतानी | एच.आय.जी. २३८, रतनलाल नगर, उद्योग नगर, कानपूर-२०८०२२, उत्तर प्रदेश |

वरील रोख्यांच्या संदर्भात ज्या कोणाचा दावा असेल, त्यांनी या तारखेपासून ३० दिवसांच्या आत त्यांच्या दाव्याच्या समर्थनासाठी योग्य कागदोपत्री पुराव्यासह कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात असा दावा दाखल करावा, अन्यथा कंपनी कोणत्याही पुढील सूचनेशिवाय हस्तांतरिताच्या बाजूने रोखे हस्तांतरित करण्याची कारवाई करेल.

**प्राइम सिक्युरिटीज लिमिटेड करिता**
**स्वाक्षरी/-**
**अजय शाह**
**कंपनी सचिव**
(एसीएस-१४३५९)

**मुंबई**
१८ सप्टेंबर, २०२६


# जमीन दिली, रोजगाराचा हक्क अजूनही प्रलंबित

## कोकण रेल्व प्रकल्पग्रस्तांना प्रतीक्षा; काही कुटुंबे अद्याप नोकरीपासून वंचित; प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांवरून पुन्हा आंदोलनाची तयारी

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

कोकण रेल्वे प्रकल्पासाठी जमिनी देऊन विकासाचा मार्ग मोकळा करणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या रोजगाराचा प्रश्न अद्याप पूर्णपणे सुटलेला नाही. कोकण रेल्वेच्या स्थापनेला तीन दशकांहून अधिक काळ उलटूनही काही प्रकल्पग्रस्त कुटुंबांतील पात्र व्यक्तींना अपेक्षित रोजगार मिळालेला नसल्याची स्थिती आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांकडून आपल्या हक्काच्या नोकऱ्यांसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

कोकण रेल्वे प्रकल्प उभारताना महाराष्ट्रासह गोवा आणि कर्नाटकातील मोठ्या प्रमाणावर जमीन संपादित करण्यात आली. या प्रक्रियेत अनेक कुटुंबांनी आपल्या जमिनी रेल्वे प्रकल्पासाठी दिल्या. प्रकल्पग्रस्तांना भरपाई देण्याबरोबरच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा मुद्दाही त्यावेळी महत्त्वाचा होता. कोकण रेल्वेच्या अधिकृत माहितीनुसार, प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर भूसंपादन करण्यात आले होते. मात्र, कालांतराने प्रकल्पग्रस्तांच्या रोजगाराचा प्रश्न पुन्हा पुन्हा ऐरणीवर येत आहे. रत्नागिरीसह कोकणातील प्रकल्पग्रस्त संघटनांकडून पात्र प्रकल्पग्रस्तांना रेल्वेच्या सेवेत सामावून घेण्याची मागणी केली जात आहे. अलीकडील काळातही प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांवरून आंदोलनाची भूमिका घेण्यात आल्याचे वृत्त आहे.

**आश्वासनांपलीकडे निर्णय नाही**

प्रकल्पासाठी जमीन देऊन अनेक वर्षे उलटली. पुढील पिढी शिक्षित झाली, मात्र पात्र प्रकल्पग्रस्तांना रोजगाराचा लाभ मिळण्याचा प्रश्न काही ठिकाणी कायम असल्याचा दावा प्रकल्पग्रस्त संघटनांकडून केला जात आहे. त्यामुळे केवळ भरतीच्या वेळी प्राधान्य देण्याऐवजी जुन्या प्रकल्पग्रस्त प्रकरणांचा स्वतंत्र आढावा घेऊन त्यावर कालबद्ध निर्णय घेण्याची मागणी पुढे येत आहे. कोकण रेल्वेच्या सध्याच्या भरती प्रक्रियेत विविध तांत्रिक व अभियंता पदांसाठी भरती सुरू असल्याचेही अलीकडे प्रसिद्ध झाले आहे. त्यामुळे या भरती प्रक्रियेत प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्यांचा कसा विचार केला जातो, याकडे आता लक्ष लागले आहे.



**भरतीमध्ये प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य**

कोकण रेल्वेच्या विविध भरती प्रक्रियांमध्ये प्रकल्पासाठी जमीन गमावलेल्या उमेदवारांना म्हणजेच 'लँड लॉजर' उमेदवारांना प्राधान्य देण्याची तरतूद असल्याचे अलीकडील भरतीविषयक माहितीत नमूद करण्यात आले आहे. ऑगस्ट २०२६ मधील भरतीच्या वृत्तांमध्येही प्रकल्पग्रस्त उमेदवारांना प्रथम प्राधान्य असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र, भरतीतील प्राधान्य आणि जुन्या प्रकल्पग्रस्त कुटुंबांतील पात्र व्यक्तींचे प्रलंबित प्रश्न यामध्ये समन्वय कसा साधला जाणार, हा मुद्दा प्रकल्पग्रस्तांकडून उपस्थित केला जात आहे.

त्यामुळे उपलब्ध रिक्त पदे, आतापर्यंत नोकरी मिळालेल्या प्रकल्पग्रस्तांची संख्या, पात्र असूनही प्रलंबित असलेल्या अर्जांची संख्या आणि भविष्यातील भरतीमध्ये प्रकल्पग्रस्तांसाठीची प्रक्रिया याबाबत स्पष्टता आवश्यक आहे.


**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**अनुज्ञापन खाते (अतिक्रमण निर्मूलन) विभाग**
**सआ/आर-उत्तर/ओडी/५१/अ.नि. दि. ०८.०९.२०२६**

**जाहिर सुचना**

आर-उत्तर विभागातील अनुज्ञापन खात्यात अतिक्रमण निर्मूलन विभागामध्ये अनधिकृत फेरीवाल्यांवरअतिक्रमण निर्मूलन कारवाईकरिता तसेच अनधिकृत जाहिरात फलक (बॅनर्स, बोर्ड्स) यांच्यावर निष्कासनाची कारवाई करण्याकरिता कंत्राटी कामगारांची नेमणूक करावयाचीआहे. सदर कामासाठी इच्छुक स्थानिक (आर/उत्तर प्रभागाच्या कार्यक्षेत्रात) अनुभवी अशासकीय/सेवा सहकारी/बेरोजगार संस्थेची निवड करण्यासाठी इच्छापत्र मागविण्यात येत आहेत व सदरची जाहीर सुचना म.न.पा. संकेतस्थळावर http://portal.mcgm.gov.in या वर प्रदर्शित करण्यात आली आहे.

सदर इच्छापत्राचा नमुना वरिष्ठ निरीक्षक (अति. निर्मू.) बृहन्मुंबई महानगरपालिका आर/उत्तर विभाग कार्यालय, दुसरा मजला, रंगनाथ केसरकर मार्ग, रुस्तमजी शाळे जवळ, दहिसर (प) मुंबई - ४०००६८ येथे चलन काढून दि. २१.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ या दिवशी सकाळी १०.३० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत कामाच्या दिवशी (दुसरा व चौथा शनिवार व सुट्टीचा दिवस सोडुन) लेखी अर्जकरून रू.३९९३/- अधिक १८% जिएसटी हि रक्कम भरून विकत मिळेल व रुपये ४४,४००/- इ.सा.रा. (EMD) रक्कम रोख किंवा डी.डी. याद्वारे भरून आवश्यक कागदपत्रांसहित सिलबंद अर्ज दि.२८.०९.२०२६ पर्यंत दुपारी २.०० वाजे पर्यंत अनुज्ञापन खात्यात अतिक्रमण निर्मूलन विभाग आर/उत्तर विभाग कार्यालय, दुसरा मजला, रंगनाथ केसरकर मार्ग, रुस्तमजी शाळे जवळ, दहिसर (प) मुंबई-४०००६८ येथे सिलबंद पेटीमध्ये टाकावे. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

**सही/-**
**सहाय्यक आयुक्त, आर-उत्तर विभाग**

**PRO/1457/ADV/2026-27**

झाडे लावा, झाडे जगवा.